रविवार
महाराष्ट्र टाइम्स
FRONT PAGE - 2



### अयोध्येत तिलकोत्सव

**काठमांडू :** नेपाळच्या जनकपूरधाम येथून शेकडो भाविक अयोध्येच्या दिशेने तिलकोत्सवासाठी रवाना झाले आहेत. श्रीराम-जानकीच्या विवाहाचे निमंत्रण देण्यासाठीची ही प्रथा आहे.

# 'डिजिटल युगात बालसाहित्याचे प्रकाशन आव्हानात्मक'

**म. टा. विशेष प्रतिनिधी, नवी दिल्ली**

बालसाहित्य निर्मितीचा मार्ग सोपा नाही व डिजिटल युगात बालसाहित्य प्रकाशनाही आणखी कठीण झाले आहे अशी भावना बालसाहित्य पुरस्कार २०२४च्या विजेत्या लेखकांच्या मेळाव्यात शनिवारी व्यक्त झाली. प्रत्येक लेखकाची स्वतःची अशी वेगळी सर्जनशील प्रक्रिया आणि अनुभव असतात, त्यातूनच त्यांचे साहित्य उदयास येते असेही पुरस्कार विजेत्यांनी सांगितले.

लखनऊ येथे झालेल्या या कार्यक्रमात मराठी विभागासाठीचे पुरस्कार विजेते भारत सासणे म्हणाले की किशोरवयीन मनात रहस्य, साहस, धाडस, उत्सुकता इत्यादींबाबत प्रचंड कुतूहल असते, हे लक्षात घेऊन मी 'समशेर कुलूपघरे' हे प्रातिनिधिक पात्र मुलांसाठी तयार केले. कोकणी भाषेसाठीच्या विजेत्या हर्षा सद्गुरु शेट्ये यांनी सांगितले की, माझ्या पुस्तकातील मुख्य पात्र बायुल ही माझीच जीवनकथा आहे. माझ्या बालपणीचे पन्नास वर्षांपूर्वीचे गोव्यातील लहानसे गाव माझ्या या कादंबरीत आले आहे.

साहित्य अकादमीच्या उपाध्यक्ष कुमुद शर्मा यांनी सांगितले की, आज मुले टीव्ही आणि मोबाइल फोनमधून सर्व काही शिकत आहेत, यामुळे ती




लहान वयातच प्रौढ होत आहेत. या डिजिटल युगात मुलांना पुस्तकांवर प्रेम करायला शिकवणे हे मोठे आव्हान आहे. तुमच्यासारखे लेखक ही जबाबदारी पार पाडत आहेत ही मोठी गोष्ट आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये बाल अभ्यास केंद्रे उघडण्याची गरज शर्मा यांनी व्यक्त केली.

पंजाबचे कुलदीप सिंग, राजस्थानचे प्रल्हादसिंग झोरडा, संस्कृतसाठीचे विजेते हर्षदेव माधव यांच्यासह दीपन्विता राय (बंगाली), बिशनसिंग दर्दी (डोगरी), कृष्णमूर्ती बिलगेरे (कन्नड), नारायण जी (मैथिली) भागिन जेकेथा मोसहारी (बोडो), मुझफ्फर हुसेन दिलबर (काश्मीर), उन्नी अम्मयम्बलम (मल्याळम), क्षेत्रीमायुम सुबदनी (मणिपुरी), वसंत थापा (नेपाळी), मानस रंजन सामल (ओडिया), दुगई तुडू (संथाली), युमा वासुकी (तमिळ), पामिडिमुक्कला चंद्रशेखर (तेलुगू) आदींनीही लेखनानुभव सांगितले.

मराठीतील बालसाहित्याचे भविष्य अतिशय उज्ज्वल आहे, असा आशा सविता करंजकर यांनी व्यक्त केली. 'बालसाहित्य लेखन : भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य' या विषयावर झालेल्या परिसंवादात बालसाहित्यासमोरील नवीन आव्हानांबाबत बोलताना करंजकर म्हणाल्या की, श्यामची आई हे मूळ मराठी बालसाहित्यातील कालातीत रचना आहे. फास्टर फेणेसारख्या पात्रांच्या कथा मराठी मुलांना खूप आवडल्या. मराठीत मुलांची अनेक मासिके आहेत. महाराष्ट्र सरकारतर्फे किशोर मासिकाचे शाळांत वितरण केले जाते. महाराष्ट्रात मुलांसाठी दिवाळी विशेषांक काढण्याची व बालनाट्य चळवळीची परंपराही सशक्त आहे.